आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी २.५० वाजता

२५ नोव्हेंबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला प्रारंभ/ पहिल्याच दिवशी अदानी प्रकरणावरुन विरोधकांचा गदारोळ/ दोन्ही सदनांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- राज्यात मुख्यमंत्रीपदासंदर्भात अद्याप निर्णयाची प्रतीक्षा

- जागतिक सहकार परिषदेचं आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नवी दिल्लीत उद्घाटन

- २०१४ ते २०२४ या दहा वर्षाच्या काळात ५ लाख रेल्वे कर्मचाऱ्यांची भर्ती पारदर्शक पद्धतीन् झाल्याचं रेल्वेमंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

- बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचा ऑस्ट्रेलियावर २९५ धावांनी दणदणीत विजय/ भारतीय संघ कसोटी क्रिकेट क्रमवारीत ठरला अव्वल

**<><><><><>**

अदानी उद्योग समूहाविरोधातल्या कथित लाचखोरी प्रकरणावरून विरोधकांनी गदारोळ केल्यानंतर आज संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. लोकसभेत सुरुवातीला दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण, माजी खासदार हरिश्चंद्र चव्हाण आणि इतर दिवंगत सदस्यांना आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी अदानी समूहावरल्या कथित लाचखोरी प्रकरण आणि उत्तर प्रदेशातल्या संभल इथल्या हिंसाचार प्रकरणावरून गदारोळ केल्यामुळं पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं.राज्यसभेतही दिवंगत आजी माजी सदस्यांना आदरांजली वाहण्यात आली.

अदानी उद्योग समूहावर झालेल्या कथित लाचखोरी प्रकरणावरून विरोधकांनी स्थगन प्रस्तावाची मागणी केली होती, ती अध्यक्षांनी फेटाळून लावली. हा प्रस्ताव अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार नसल्याचं कारण त्यांनी दिलं. भारतीय संविधानाला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत आहेत, त्यामुळे संसद सदस्यांनी लोकांसमोर उच्च आदर्श प्रस्थापित करावेत, अशी अपेक्षा धनखड यांनी व्यक्त केली. राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे आणि डावे पक्ष, द्रमुक, राजद, आप यांच्या खासदारांनी अदानी समूहावरल्या कथित आरोपावर बोलायचा प्रयत्न केला, मात्र त्यांना परवानगी नाकारण्यात आली. संविधानदिनानिमित्त उद्या दोन्ही सभागृहांची बैठक होणार नाही.

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विधायक चर्चा होईल, अशी आशा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. अधिवेशन सुरू होण्याआधी ते आज माध्यमांशी बोलत होते. भारताने संविधान स्वीकारून ७५वर्षे झाली आहेत हे यंदाचं वैशिष्ट्य असून यासह अनेक कारणांसाठी हे अधिवेशन विशेष असेल, असं मोदी म्हणाले. यावेळी प्रधानमंत्र्यांनी विरोधकांवर टीका केली. मतदारांनी सत्ता द्यायला नकार दिलेले मूठभर लोक संसदेत विनाकारण गोंधळ करतात, असं ते म्हणाले.

संसदेतल्या वेळेचा उपयोग देशाची प्रतिष्ठा जगात वाढवण्यासाठीच करायला हवा, अशी अपेक्षा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली. देशातल्या मतदारांचा संविधानाबद्दलचा विश्वास, लोकशाहीविषयीची वचनबद्धता यांना काही अर्थ आहे, असा संदेश संसदेतून जायला हवा, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

संविधान सभेतल्या वादविवादापासून प्रेरणा घेत सभागृहाच्या सदस्यांनी संसदेच्या शिष्टाचाराचं पालन करावं, असं आवाहन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत केलं. संविधान हे प्रत्येक नागरिकाचं असून त्यावर देशातल्या सर्व नागरिकांचा विश्वास असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयक २०२४ च्या संयुक्त संसदीय समितीमधल्या विरोधी पक्षांच्या खासदारांनी आज लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांची भेट घेतली. संयुक्त संसदीय समितीचे प्रमुख, विरोधी पक्षातल्या सदस्यांचं मत विचारात घेत नसून अहवाल तयार करण्याची घाई करू नये असं आपण सभापतींना सांगितल्याची माहिती तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी या बैठकीनंतर माध्यमांना दिली. सभापतींनी विरोधी पक्षांच्या खासदारांचं म्हणणं ऐकून घेतलं आणि अहवाल सादर करण्याची मुदत वाढवण्याचं आश्वासन दिलं.

**<><><><><>**

उद्याच्या संविधानदिनानिमित्त आज नवी दिल्लीत हमारा संविधान हमारा स्वाभिमान पदयात्रा काढण्यात आली. डॉ. मनसुख मांडवीय, पीयुष गोयल, अर्जुन राम मेघवाल, किरेन रिजिजू, गजेंद्रसिंग शेखावत, रक्षा खडसे या केंद्रीय मंत्र्यांसह अनेक खासदार सहभागी झाले होते.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर राज्यात सत्तास्थापनेबाबत विविध पातळ्यांवर चर्चा सुरु आहे. महायुतीतल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या विधिमंडळ पक्षांच्या नेत्यांची निवड झाली आहे. शिवसेनेच्या गटनेतेपदी विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतेपदी अजित पवार

यांची निवड कालच झाली. मात्र भाजपा विधिमंडळ पक्षाची नेतानिवड अद्याप बाकी आहे. भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठक आज होणार असून ती झाल्यावर मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय होईल, असं अजित पवार यांनी आज सातारा जिल्ह्यात कराड इथं सांगितलं. माजी मुख्यमंत्री आणि देशाचे माजी उपप्रधानमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त कराड इथल्या त्यांच्या स्मृतिस्थळावर पवार त्यांनी आदरांजली वाहिली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या गटनेतेपदी भास्कर जाधव यांची निवड झाली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत जागतिक सहकार परिषदेचं उद्घाटन होणार आहे. आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेच्या गेल्या १३० वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच ही परिषद भारतात होत आहे. उद्घाटनाच्या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त एका विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण या बातमीपत्रानंतर आकाशवाणीवरुन ऐकता येईल.

**<><><><><>**

संविधानाचा सन्मान केवळ संविधानाचं पुस्तक दाखवून होत नाही तर संविधानाचा सन्मान नतमस्तक होऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला होता, असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज सांगितलं. ते नागपूर इथं अखिल भारतीय अनुसूचित जाती- अनुसूचित जमाती रेल्वे कर्मचाऱ्यांच्या राष्ट्रीय अधिवेशनात बोलत होते.

२००४ ते २०१४ या १० वर्षात रेल्वेमधे ४ लाख ४० हजार कर्मचाऱ्यांची भर्ती झाली होती परंतु २०१४ ते २०२४ या दहा वर्षाच्या काळात ५ लाख रेल्वे कर्मचाऱ्यांची भर्ती पारदर्शक पद्धतीनं झाली आहे. या भर्तीसाठी एक वार्षिक कॅलेंडर सुद्धा रेल्वेनं पहिल्यांदाच तयार केलं असल्याचं त्यांनी सांगितलं

दोन दिवसांच्या या मेळाव्यात या संघटनेचे देशभरातून सुमारे ३० हजार कर्मचारी सहभागी होत आहेत.

<><><><><>

केंद्र सरकारचं महिला आणि बालविकास मंत्रालय, आणि ग्रामीण विकास मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यामाने, आजपासून ‘अब कोई बहाना नही’ हे अभियान सुरु होत आहे. महिलांवरच्या अत्याचाराचं निर्मूलन करण्याच्या दृष्टीनं हे अभियान राबवलं जाणार आहे. अभियानाचा एक भाग म्हणून, ‘अब कोई बहाना नही’ या शीर्षकाच्या एका लघुचित्रपटाचं प्रदर्शन यावेळी करण्यात येणार आहे. याच वेळी नई चेतना या उपक्रमाच्या तिसर्या आवृत्तीलाही सुरुवात होणार आहे. दरवर्षी २५ नोव्हेंबर हा महिलांवरच्या अत्याचाराविरोधातला जागतिक दिवस म्हणून पाळण्यात येतो.

<><><><><>

बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिला सामना भारतानं २९५ धावांनी जिंकत १-० अशी आघाडी घेतली आहे. या विजयामुळे जागतिक क्रिकेट कसोटीच्या क्रमावारीत भारतानं अव्वल स्थान मिळवलं आहे. भारतीय संघाची टक्केवारीही ५८ पूर्णांक ३३शतांश वरून आता ६१ पूर्णांक ११ शतांशावर गेली आहे.

<><><><><>

क्रिकेट, आयपीएल सामन्यांचं केलं जाणारं बेकायदा प्रसारण आणि विविध ऑनलाईन  सट्टेबाजीची चौकशी अंमलबजावणी संचालनालय करत आहे. त्याअंतर्गत अंमलबजावणी संचालनालयानं २१९कोटी रुपयांहून अधिक किंमतीची मालमत्ता तात्पुरती जप्त केली आहे.

<><><><><>

गोव्यात सुरु असलेल्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज प्रादेशिक चित्रपट दाखवले जाणार आहेत. प्रादेशिक चित्रपटांमध्ये संस्कृतीचं दर्शन होत असल्याचं

केरेबेटे या कन्नड चित्रपटाचे निर्माते आणि अभिनेते गौरीशंकर एसआरजी यांनी म्हटलं आहे. महोत्सवात आज सुमारे ७५ चित्रपट दाखवले जाणार आहेत. यावेळी ऑस्ट्रेलियन दिग्दर्शक फिलिप नॉयस "हाऊ टू सक्सेड इन न्यू हॉलीवूड" या सत्रात सहभागी होणार आहेत. तर अभिनेत्री क्रिती सॅनन आज संध्याकाळी "चित्रपटातला महिलांचा सहभाग" या विषयावर बोलणार आहे.

**<><><><><>**

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर, गुप्तचर विभागाच्या अधिकाऱ्यांनी २ कोटी ७१ लाख ४० हजार रुपये किमतीचं सुमारे ४ किलो सोनं जप्त केलं आहे. दुबईहून मुंबईत आलेल्या नंतर मालेला जाणाऱ्या एका संशयित प्रवाश्यावर अधिकारी लक्ष ठेवून होते. हा प्रवासी विमानतळ कर्मचाऱ्याला एक वस्तू सोपवत असताना गुप्तचर विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना पकडलं. यावेळी केलेल्या तपासणीत बारा पुड्यांमध्ये पावडर स्वरूपात ठेवले सोनं जप्त करण्यात असून दोघांना अटक करण्यात आली आहे.

**//<><><><><>//**